# पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण, पुणे

## *नागरीकांची सनद*

नागरिकांसाठी PMRDA च्या सेवांची माहिती

**ध्येय:**

पारदर्शकता, उत्तरदायित्व आणि नागरिकांचे समाधान.

**PMRDA आपल्यासाठी...**

आम्ही पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणात (पीएमआरडीए), नागरिकांसाठी दर्जेदार सेवा पुरवण्यास कटिबद्ध आहोत.

अधिक माहितीसाठी, कृपया प्राधिकरणाच्या अधिकृत वेबसाइटला भेट द्या: www.pmrda.gov.in

## वर्ष-२०२६

देवेंद्र फडणवीस

मुख्य मंत्री
महाराष्ट्र

मंत्रालय
मुंबई-४०० ०३२

१५ जून २०१७

## शुभेच्छा

पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणातर्फे नागरिकांची सनद प्रकाशित करण्यात येत आहे, ही समाधानाची बाब आहे.

देशात सर्वाधिक वेगाने नागरिकरण होणाऱ्या राज्यात महाराष्ट्र अग्रेसर असून येत्या काही वर्षात राज्यातील ५० टक्क्यांहून अधिक लोकसंख्येचे नागरीकीकरण होईल. या वाढत्या शहरीकरणाचे सुव्यवस्थित नियोजन करण्यासह नागरिकांचे जीवनमान उंचाविण्यासाठी राज्य शासन विविध उपक्रम आणि अभियाने राबवित आहे.

पुणे परिसरातील नागरिकांच्या आकांक्षांना न्याय देण्यासाठी शासनाकडून पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाची स्थापना करण्यात आली आहे. या प्राधिकरणातर्फे प्रकाशित करण्यात येणाऱ्या नागरिकांच्या सनदेच्या माध्यमातून पारदर्शक, कार्यक्षम आणि तातडीने पुरविण्यात येणाऱ्या सेवांबाबत नागरिकांमध्ये जागृती निर्माण करणे शक्य होणार आहे. त्यामुळे हा उपक्रम प्रशंसनीय आहे. नागरिकांच्या समस्या सुलभरित्या सोडविण्यासाठी प्राधिकरण भविष्यातही तत्परतेने कार्यरत राहील, असा विश्वास वाटतो.

(देवेंद्र फडणवीस)

दूरध्वनी : ०२२-२२०२ ५१५१/२२०२ ५२२२, फॅक्स : ०२२-२२०२ ९२१४
ई-मेल : cm@maharashtra.gov.in, वेब साईट : www.maharashtra.gov.in

**प्रस्तावना:**

पुणे महानगर प्रदेश क्षेत्राचा नियोजनबद्ध विकास करण्याकरिता पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाची स्थापना करण्यात आली आहे.

**प्राधिकरणाचे ध्येय :**

पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण (पीएमआरडीए) हे नागरिकांसाठी उत्कृष्ट जीवनसुविधा आणि जागतिक गुंतवणूकदारांसाठी उत्तम आर्थिक संधी उपलब्ध करून देणारे भविष्य घडविण्यास वचनबद्ध आहे. प्राधिकरणाचे ध्येय पुढीलप्रमाणे आहे:

- नियोजित वाढ सुलभ करणे: शाश्वत नागरी विकासाला पाठबळ देणारी पायाभूत सुविधा आणि सार्वजनिक सेवा विकसित करणे.
- व्यवसाय सुलभता: देशांतर्गत आणि आंतरराष्ट्रीय गुंतवणूकदारांसाठी व्यवसायाचे अनुकूल वातावरण निर्माण करून आर्थिक विकास आणि गुंतवणूक प्रोत्साहित करणे.
- भविष्योन्मुख प्रशासन: तंत्रज्ञान, नवोन्मेष आणि बाजाराभिमुख अर्थव्यवस्थेच्या तत्त्वांवर आधारित प्रशासन प्रणाली अंमलात आणणे.
- हरित नवोन्मेष: हरित नवोन्मेष, ई-व्यवस्थापन आणि डिजिटल माहिती प्रसारणाच्या माध्यमातून शाश्वत विकास साध्य करणे.
- शाश्वत रोजगार: सर्वांसाठी समावेशक आणि दीर्घकाळ टिकणाऱ्या रोजगार व संपत्ती निर्मितीच्या संधी निर्माण करणे.
- संस्कृती आणि वारसा: पीएमआरच्या परिसंस्थेत स्थानिक संस्कृती आणि वारसा यांचा समावेश करून त्याची वैशिष्ट्यपूर्ण ओळख जपणे.
- उच्च आनंद निर्देशांक: नागरिकांच्या कल्याण आणि समाधानाला प्राधान्य देऊन उच्च जीवनमान आणि आनंदी जीवनशैलीला प्रोत्साहन देणे.

पुणे महानगर प्रदेशातील पर्यावरण संरक्षण, संसाधन संवर्धन आणि हरित विकासाला चालना देत शाश्वत नागरी वाढीसाठी प्राधिकरण वचनबद्ध आहे.

**प्राधिकरणाचे कार्यक्षेत्र-**

पुणे महानगर विकास क्षेत्रामध्ये ८ तालुक्यांमधील ६९७ गावे, २ महानगरपालिका, ३ कँन्टॉनमेंट बोर्ड, ७ नगरपरिषदा व २ नगरपंचायतींमधील एकूण ६,९१४.२६ चौ.मी इतक्या क्षेत्राचा समावेश होतो.

**निर्णयाबाबतची कार्यपद्धती :**

प्राधिकरणातील विविध विभागांचे कामकाज चालविण्यासाठी प्रकरण महानगर प्रादेशिक आणि नगर रचना अधिनियम १९६६ व महाराष्ट्र महनगर प्रदेश विकास प्राधिकरण अध्यादेश २०१६ या अधिनियमांना अधीन राहून अंतिम निर्णय प्राधिकरण सभेमध्ये घेतले जातात.

नियमावलीतील कार्यपध्दतीनुसार व प्राधिकरण सभेने घेतलेल्या धोरणात्मक निर्णयानुसार निर्णय प्रक्रिया होत असते. काही बाबतीत प्राधिकरण दैनंदिन कामकाजाच्या बाबतीत आपल्या दुय्यम अधिकाऱ्यांना शक्ती प्रदान करू शकतात. प्राधिकरणाचे अध्यक्ष हे प्राधिकरणाच्या वतीने सर्व कामकाजाचे निरीक्षण व नियंत्रण करतील आणि या अध्यादेशान्वये बहाल केलेल्या शक्तींचा वापर करून प्राधिकरण वेळोवेळी निश्‍चित करेल अशी सर्व कर्तव्ये पार पडतील. परंतु, अध्यक्ष हे सहअध्यक्षांना आपल्या शक्ती व कर्तव्ये पार पाडण्यासाठी नियुक्त करू शकतील.

महानगर आयुक्त हे प्राधिकरणाचे मुख्य कार्यकारी अधिकारी असतील आणि अशा शक्तींचा वापर करून प्राधिकरण ठरावाद्वारे निश्‍चित केलेली कार्ये व कर्तव्ये पार पाडतील. महानगर आयुक्त हे सर्वसाधारण किंवा विशेष आदेशाद्वारे प्राप्त शक्ती, कार्ये व कर्तव्ये कलम ७ च्या उपकलम ५ अन्वये उक्त आदेशामध्ये उल्लेख केल्यानुसार दुय्यम अधिकाऱ्यांकडे बहाल करू शकतील.

**प्राधिकरणाचे कार्यालयातील दस्तऐवजांची माहिती :**

पुणे महानगर प्रदेश क्षेत्र विकास प्राधिकरणाकडे खालील प्रकारची कागदपत्रे असतात.

1. मुळ योजनेचा शासनमान्य नकाशा.
2. प्राधिकरण सभेचे इतिवृत्तांत.
3. कार्यकारी समिती बैठकांचे इतिवृत्तांत.
4. बांधकामाबाबतचे नकाशे, बांधकाम परवाने, पूर्णत्वाचे दाखले इ.
5. विविध विभागाकडील महत्वाच्या विषयासंबधी जतन करावयाच्या नस्त्या, नोंदवह्या, विकास परवानगी विभागाकडील निर्णय पूर्ण झालेल्या नस्त्या इ.
6. प्राधिकरणाच्या जमीन व मालमत्तांबाबतची कागदपत्रे

**प्राधिकरणाची धोरणे/निर्णय ठरवण्यासाठी जनसामान्यांशी सल्ला मसलतीबाबत तरतूद :**

पुणे महानगर प्रदेश क्षेत्र विकास प्राधिकरणास लागू असलेल्या महाराष्ट्र प्रादेशिक आणि नगर रचना अधिनियम १९६६ च्या तरतुदीप्रमाणे प्राधिकरण विकास योजना तयार करून अथवा त्यातील बदलाबाबत कायदेशीर तरतुदीनुसार जाहिरात प्रसिद्ध करते. अशा जाहिरातीस सुनावणी देण्यात येते आणि नंतरच विकास योजनेतील विविध प्रयोजनांची आरक्षणे अथवा बदल शासनाच्या मान्यतेने कायम केले जातात. इतर प्रशासकीय कामेही शासन मान्य, बांधकाम नियमावली तसेच शासन निर्णयानुसार चालतात. प्राधिकरण समितीवर लोक प्रतिनिधीत्व अथवा सल्लामसलतीची नियुक्तीची तरतूद वैधानिकरित्या अधिनियमातच केली आहे.

**जनसामान्यांकडून सूचना :**

नागरिकांची सनद सर्वसामान्य नागरिकांच्या छाननीसाठी नेहमीच खुली असते व सन्माननीय नागरिकांच्या बहुमूल्य सूचनांचा गांभीर्यपूर्वक विचार करून त्यात वेळोवेळी सुधारणा घडवून आणता येतील. प्राधिकरणाच्या अधिनस्त येणाऱ्या सेवा उपभोगणाऱ्या नागरिकांना आपले हक्क मांडण्यासाठी सनद नेहमीच सहकार्य करेल.

**नागरिकांच्या सनदेची अंमलबजावणी :**

प्राधिकरण नागरिकांच्या या सनदेची अंमलबजावणी करण्यास कटिबद्ध आहे. प्राधिकरण आपल्या अधिपत्याखालील सेवा कर्तव्यभावनेने व कार्यतत्परतेने उपलब्ध करून देण्याची हमी देत आहे. या सेवा पुरविताना नागरिकांना सौजन्यपूर्ण वागणूक देण्याची जबाबदारी प्राधिकरणातील प्रत्येक अधिकारी/कर्मचाऱ्यांची राहील.

**प्राधिकरणामार्फत सुरु असलेली महत्वाची कामे /प्रकल्प -**

1. माण-हिंजवडी ते शिवाजीनगर पुणे मेट्रो प्रकल्प
2. अंतर्गत रिंग रोड प्रकल्प
3. नगररचना योजना
4. लोणावळा स्कायवॉक
5. पुल-
   अ. यवत आणि राहू (म.रा.मार्ग 119) दरम्यान रेल्वे उड्डाणपूल बांधकाम, तालुका-दौंड, जिल्हा पुणे.
   ब. खामगाव टेक – हिंगणगाव, ता. हवेली येथे मुळा-मुठा नदीवरील मोठ्या पुलाचे बांधकाम
6. चौक सुधारणा- कान्हे फाटा (राष्ट्रीय महामार्ग), तळेगाव एस.एच. ५५, कोरेगाव भीमा, डोणजे फाटा, गोळेवाडी चौक, डोणजे, पेरणे फाटा, लोणीकंद फाटा, केसनंद फाटा, शिक्रापूर, सिंबायोसिस लवळे, नांदे चौक, थेऊर फाटा, पिरंगुट, गोडांबेवाडी, सासवड चौक, केसनंद गाव, वढु बु. इ.
7. प्राधिकरण क्षेत्रातील रस्ते विकास कार्यक्रमाचे नियोजन व वाहतुक कोंडीवरील उपाययोजना करणे.
8. प्राधिकरण क्षेत्रातील इंद्रायणी, पवना नदी सुधार प्रकल्प.
9. पुणे महानगर क्षेत्रातील अंतर्गत रिंग रोडलगत बहुविध वाहतूक केंद्रांचा विकास
10. आंतरराष्ट्रीय प्रदर्शन व परिषद केंद्र (PEICC)
11. येरवडा-कात्रज Twin Tunnel प्रकल्प
12. पुणे विद्यापीठ चौक येथे एकात्मिक दुमजली उड्डाणपुलाचे बांधकाम
13. पॉक्सो कोर्ट बांधकाम
14. पोलीस गृहनिर्माण- औंध, बावधन.
15. प्रधानमंत्री आवास योजनेंतर्गत परवडणारी घरे
16. नागरी विकास केंद्रात विविध ठिकाणी मल:निसारण प्रकल्प करणे.
17. भूकुम गावातील मानस तलावजवळ मल: निसारण केंद्राचे (STP) बांधकाम करणे.
18. देहू येथील इंद्रायणी नदी काठी कापूर ओढा ते जगतगुरू तुकाराम महाराज मंदिर घाट विकसित करणे

19. क्रिडा पायाभूत सेवा तयार करणे
20. धार्मिक स्थळ कनेक्टिव्हिटी
21. पर्यटन स्थळ कनेक्टिव्हिटी

**पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाकडून नागरीकांना उपलब्ध करून देण्यात येणा-या सेवा-**

| अ.क्र. | सेवेचे नाव | सेवा देण्याचा विहित कालावधी | सेवा देणा-या अधिका-याचे पदनाम | विहित कालावधीत सेवा प्राप्त न झाल्यास तक्रार करावयाच्या अधिका-याचे पदनाम |
|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 |
| **१. नियोजन विभाग** | | | | |
| 1. | साईट एलेवेशन प्रमाणपत्र | ७ दिवस | सहायक नियोजनकार (सहायक नगर रचनाकार) | उप महानगर नियोजनकार |
| 2. | झोन दाखला | ७ दिवस | | |
| 3. | भाग नकाशा | ३ दिवस | | |
| 4. | झोनिंग सीमांकन | ७ दिवस | | |
| **२. जमीन व मालमत्ता विभाग** | | | | |
| 1. | वाटप भूखंडावर / गृहयोजनेतील सदनिकांचे हस्तांतरण करणे | ३० | उप आयुक्त जमिन व मालमत्ता विभाग | सह आयुक्त , जमीन व मालमत्ता विभाग |
| 2. | वाटप भूखंडावर / गृहयोजनेतील सदनिकांवर वारसनोंद करणे | १५ | | |
| 3. | वाटप भूखंडावर / गृहयोजनेतील सदनिकांवर कर्जासाठी ना हरकत दाखला देणे | १५ दिवस | | |
| 4. | प्राधिकरण मालकीच्या मोकळ्या जागा तात्पुरत्या स्वरुपात भाडेतत्वावर देणे | ३० दिवस | उप आयुक्त जमिन व मालमत्ता विभाग | सह आयुक्त , जमीन व मालमत्ता विभाग |
| 5. | भाडेपट्ट्यानंतर भूखंडाचा ताबा देणे | १५ दिवस | उप आयुक्त जमिन व मालमत्ता विभाग | |
| 6. | वाटप भूखंडाची फेरमोजणी करून देणे | ३० दिवस | उप अधिक्षक, भूमी अभिलेख | |
| **३. विकास परवानगी विभाग** | | | | |
| 1. | इमारत बांधकाम परवानगी | ३० दिवस | सहायक नियोजनकार (सहायक नगर रचनाकार) | उप महानगर नियोजनकार |
| 2. | जोता मोजणी प्रमाणपत्र | ७ दिवस | | |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| 3. | भोगवटा प्रमाणपत्र | ८ दिवस | | |
| 4. | सुधारित बांधकाम परवानगी | ३० दिवस | | |
| 5. | तात्पुरती रेखांकन परवानगी | ३० दिवस | | |
| 6. | सुधारित तात्पुरते रेखांकन | ३० दिवस | | |
| 7. | अंतिम रेखांकन परवानगी | ३० दिवस | | |
| 8. | नुतनीकरण परवानगी | ३० दिवस | सहायक / नगर रचनाकार/ रचना सहायक | उप महानगर नियोजनकार/ सह महानगर नियोजनकार |
| 9. | IOD | २१ दिवस | | |
| 10. | अंशत: भोगवटा प्रमाणपत्र | ८ दिवस | | |
| 11. | अभियंता परवाना | २१ दिवस | | |
| 12. | स्ट्रक्चरल अभियंता परवाना | २१ दिवस | | |
| 13. | सुपरवाईजर परवाना | २१ दिवस | | |
| 14. | नगर अभियता परवाना | २१ दिवस | | |
| 15. | आकाशचिन्ह परवाना | ३० दिवस | सहायक / नगर रचनाकार/ रचना सहायक | उप महानगर नियोजनकार/ सह महानगर नियोजनकार |
| 16. | आकाशचिन्ह नियमितीकरण परवाना | ३० दिवस | | |
| 17. | तात्पुरती वृक्ष ना-हरकत प्रमाणपत्र | ४५ दिवस | वृक्ष अधिकारी | संचालक (विकास परवानगी) |
| 18. | अंतिम वृक्ष ना-हरकत प्रमाणपत्र | ४५ दिवस | वृक्ष अधिकारी | संचालक (विकास परवानगी) |
| **४. अग्निशमन विभाग** | | | | |
| 1. | EC ना-हरकत दाखला | १५ दिवस | अग्निशमन केंद्र अधिकारी | विभागीय अग्निशमन अधिकारी |
| 2. | अग्निशमन बंदोबस्त | १५ दिवस | | |
| 3. | प्राथमिक अग्निशमन ना-हरकत दाखला | १५ दिवस | | |
| 4. | अंतिम अग्निशमन ना-हरकत दाखला | १५ दिवस | | |